# कार्यालय, शिक्षण विभाग (प्राथमिक ),जिल्हा परिषद, सिव्हिल लाईन, नागपूर

## नमुना दोन

ग्राम : नागपूर शहर

दूरध्वनी:- 0712-2560902

ई मेल :- ssanagpurl@yahoo.co.in

फॅक्स:- 0712-2549149

जावक क्र :- जि प ना प्रा/RTE/शा. मा./का क्र २५/ 2488/२०२०

कार्यालय शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद नागपूर

विभाग - नागपूर, राज्य - महाराष्ट्र.

दिनांक :- 23/03/2020

प्रति,

**अध्यक्ष / सचिव**

**फ्रांसिलीन एज्युकेशन सोसायटी,**

**मोहन नगर, नागपूर**

**विषय :- बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009 यांच्या कलम 18 च्या प्रयोजनार्थ बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम 2011 यांच्या नियम 11 पोट-नियम (4) अन्वयक शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत.**

उपरोक्त विषयान्वये आपल्या दिनांक - **04/02/2020** च्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर यासंदर्भात शाळेशी केलेला पत्रव्यवहार / शाळेची केलेली तपासणी या आधारे **मी चिंतामण वंजारी, शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद नागपूर,** दिनांक **01/04/2019 ते 31/03/2022** पर्यंत तीन वर्षाच्या कालावधीसाठी इयत्ता 1 ते 8 **सेंट जॉन पब्लिक स्कूल, मोहन नगर, तहसिल जि. नागपूर** या शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे.

**वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन आहे.**

1. मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा सलंग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.

2. बालकंना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, 2009 (जोडपत्र एक ) आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम 2011 (जोडपत्र दोन ) मधील तरतुदीचे शाळा पालन करील.

3. शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना, पहिल्या इयतेत, त्या इयतेतील विद्यार्थी संख्येच्या किमान 25 % मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्ताच्या बाबतीत देखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल .

4. परिच्छेद 3 मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम 12 (2) नुसार प्रतिपूर्ती मिळेल. अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.

5. संस्था / शाळा कोणतेही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पद्धतीसाठी बालकास किंवा त्याच्या माता-पित्यास किंवा पालकांना भाग पडणार नाही.

6. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या आभावी, धर्म जात किंवा वंश, जन्मठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.

7. (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयतेत असेल त्याच इयतेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.

(दोन) कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

(तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

(चार) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास, नियम 23 अन्वय निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल. .

(पाच) विकलांग / विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांचा अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करण्यात येईल.

(सहा) अधिनियमांच्या कलम 23 (1) अन्वय निर्धारित केलेली किमान अहर्ता धारण करणाऱ्या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल, परंतु आणखी असे की, अधिनियमांच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अहर्ता धारण करणाऱ्या शिक्षकांना अशी किमान अहर्ता 5 वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

(सात) अधिनियमांच्या कलम 24(1) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची /तिची कर्तव्ये शिक्षक पार पडतील, आणि

(आठ) शिक्षकाने / शिक्षिकेने खासगी शिकवणीच्या कामात स्वत:ला गुंतवून घेऊ नये, याची सुनिश्चिती शाळा करील.

8. शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठ्यक्रमाचे पालन करील.

9. शाळा अधिनियमांच्या कलम 19 मध्ये विहीत केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

For St. John's Public School (CBSE)

R. Kulandai Raj
Manager

Principal

10. शाळा अधिनियमांच्या कलम 19 मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील. मागील तपासणीच्या वेळेत शाळेत उपलब्ध सुविधा खालीलप्रमाणे होत्या.

- शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ - 8200 **स्के. मी.**
- एकूण बांधकाम क्षेत्र - 5848 **स्के. मी.**
- खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ - 2775 **स्के. मी.**
- वर्गखोल्यांची संख्या - 54
- कार्यालय - नि - भांडार - मुख्याध्यापकांची खोली - **11 होय**
- मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधन गृह - जेथे वापरण्यासाठी व प्रसाधन गृहे स्वच्छ आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल - **होय**
- पिण्याच्या पाण्याची सुविधा - **होय**
- दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वयंपाकघर - **लागू नाही**
- अध्यापन - अध्यापन साहित्य / खेळ व क्रीडा विषयक सामुग्री / ग्रंथालय यांची उपलब्धता – **आहे**
- वाचन साहित्य विनायस उपलब्ध - **5800 पुस्तके उपलब्ध आहेत.**
- सर्व सुविधा विना अडथळा उपलब्ध आहेत काय ? - **आहे**
- शाळेला संरक्षण भिंत आहे काय ? – **आहे**

11. मान्यता नसलेल्या वर्ग किंवा तुकडया, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र, चालविता येणार नाहीत.

12. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

13. शाळा, सोसायटी नोंदणी अधिनियम, 1860 (1860 चा 21) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, 1950 अन्वय नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

14. शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरिता किंवा कोणत्याही नफा मिळविण्याकरिता चालविण्यात येत नाही.

15. शाळेचे लेखी सनदी लेखापालाकडून लेखापरीक्षित व प्रमाणित करून घ्यावेत आणि नियमानुसार योग्य लेखा विवरण पत्र तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरण पत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिकाऱ्याकडे पाठविण्यात यावी.

16. तुमच्या शाळेला मिळालेला मान्यता सांकेतांक (U-DISE) 27091404206 असा आहे, हा या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करताना कृपया तो नमूद करावा, याची नोंद घ्यावी.

17. शिक्षण संचालक / जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सूचनांचे पालन करावे.

18. संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही नूतनीकरण असल्यास नूतनीकरण केल्याची सुनिश्चित करावी.

19. बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009 प्रमाणे शाळेला आवश्यक असणाऱ्या उपरोक्त त्रुटींची पूर्तता दिनांक 31-03-2022 पर्यंत पूर्ण करण्यात याव्यात. **अन्यथा आपल्या शाळेची मान्यता त्यापुढे आपोआप संपुष्टात येईल.**

(चिंतामण वंजारी)
**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद नागपूर**

**प्रतिलिपी :–**
मुख्याधापक **सेंट जॉन पब्लिक स्कूल, मोहन नगर, तहसिल जि. नागपूर,** यांना माहितीस्तव अग्रेषित.

**For St. John's Public School (CBSE)**

**Principal** **Manager**

(चिंतामण वंजारी)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद नागपूर